ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 9 | ISSUE - 10 | JUNE - 2023

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# येस आय ॲम गिल्टी ! :अपराध बोधाचा प्रवास




डॉ. वसंत गायकवाड
सी.जे.पटेल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, तिरोडा.
जिल्हा– गोदिंया, (महाराष्ट्र)

'येस आय ॲम गिल्टी!' या मुनव्वर शहाच्या आत्मचरित्राची पहिली आवृत्ती 28 फेब्रुवारी, 1983 ला प्रसिद्ध झाली. 1976–77 ला पुण्यात जोशी–अभ्यंकर नावाने ओळखले जाणारे भीषण हत्याकांड घडले. हे हत्याकांड राजेंद्र जकुल, शांताराम जगताप, मुनव्वर शाह, दिलीप सुतार, सतीश गोरे आणि सुहास चांडक या सहा तरुणांनी घडवून आणले. अत्यंत गाजलेल्या या हत्याकांडातील या सहाही आरोपींना अटक झाली. त्यांच्यावर खटला चालला. शेवटी या सहापैकी चार आरोपींना फाशीची शिक्षा सुनावण्यात आली. त्यानंतर हायकोर्टात त्यांनी केलेली अपीलही फेटाळण्यात आली आणि 1983 ला यापैकी चार आरोपींना फाशी देण्यात आली. फाशी देण्यात आलेल्या चार आरोपींपैकी मुनव्वर शाह हा एक होता. फाशीची शिक्षा सुनावल्यानंतर तर प्रत्यक्ष फाशी होण्याच्या काळापूर्वी त्याने श्री. शरद गोगटे यांना सांगितलेली आत्मकथा म्हणजेच 'येस आय ॲम गिल्टी!' हे शब्दांकित आत्मचरित्र होय.

मुनव्वर शहाचे हे आत्म चरित्र सत्यघटनेवर आधारित आहे. आत्मचरित्राच्या लेखनहेतूविषयी स्वत मुनव्वर शहा लिहितो, ''तसेच माझे हे आत्म कथन एखाद्या दीपस्तंभासारखे सिद्ध व्हावे, जे माझ्या तरुण बांधवांच्या जीवनरूपी नौकांचे मोहाच्या, विकाराच्या वा कुसंगतीच्या खडकावर आपटून फुटण्यापासून रक्षण करणारे असेल आणि जे हया मार्गावर अग्रेसर असतील त्यांनी वेळीच सावध व्हावे आणि स्वतच्या विनाशापासून स्वतला वाचविणे त्यांना शक्य व्हावे.''[1] समाजातील सुज्ञ माणसांनी समाजात गुन्हा घडण्यास कारणीभूत गोष्टी नष्ट कराव्यात. गुन्हा करणाऱ्या माणसांनी वेळीच जागृत होऊन सावरावे आणि गुन्हा झाल्यानंतर गुन्हेगारांनी आपण कधी सापडणारच नाही या भ्रमात राहू नये. अशा अनेक उदात्त हेतूंनी मुनव्वर शहाने हे आत्म चरित्र लिहिले. या आत्म चरित्रातून अपराधाच्या जगात अपराध्यांचा होणारा प्रवेश, अपराधी माणसांची प्रवृत्ती, अपराध झाल्यानंतर होणारी घालमेल आणि शेवटी पकडले गेल्यानंतर होणारा पश्चाताप या साऱ्याच अपराध्यांच्या मानसिकतेवर हे आत्मचरित्र उद्‌बोधक प्रकाश टाकते.

मुनव्वर शहाचा जन्म एका मध्यमवर्गीय मुस्लिम कुटुंबात झाला. वडील कुशनमेकर तर आई शिक्षिका होती. बालपण अतिशय सुखात आणि आई–वडिलांच्या प्रेमळ सहवासात गेले. घरात धार्मिक आणि संस्कारमय वातावरण होते. शिक्षण मराठी माध्यमाच्या शाळेत झाले. मात्र वडील गणित आणि इंग्रजी घरी शिकवायचे. शिक्षणात मुनव्वर हुशार होता आणि वर्गात लोकप्रिय विद्यार्थी होता. इतरांना अभ्यासात मदत करणे हा त्याचा स्वभावधर्म होता. नवव्या वर्गात त्याची आणि शांताराम जगतापची मैत्री झाली. यानंतर पुढे कॉलेजमध्ये गेल्यानंतर जक्कल, सुतार, सोळापुरे यासारळे मित्र भेटले आणि जीवनाची दिशा फिरली. आयुष्य भरकटले यातूनच त्याच्या हातून गुन्हे घडत गेले. वाईट संगतीने संस्कारावर मात केली. आदर्श मातीमोल झाले आणि जीवनाचे स्वप्न अधांतरी लटकत राहिले.

मुनव्वर शहाला फाशीच्या फंद्यापर्यंत नेणाऱ्या गुन्ह्यांची मालिका त्याने प्रामाणिकपणे कथन केली. 15 जानेवारी 1976 ला राजेंद्र जकुल, दिलीप सुतार, शांताराम  जगताप आणि सुहास चांडक या चौघांनी आपल्याच विद्यालयातील प्रकाश हेगडे या विद्यार्थ्याच अपहरण केलं. त्याच्या वडिलांकडून 25000/— रुपयाची मागणी केली. रात्री त्याचा खून केला आणि प्रेत पिंपात  भरून तळ्यात बुडवून टाकले. त्यानंतर कोल्हापूरला अरविंद काशीद यांच्या घरी 8 व 9 ऑगस्टला दरोडा घालण्यासाठी गेले. परंतु हा प्रयत्न यशस्वी झाला नाही. 31 ऑक्टोबर 1976 विजयनगर कॉलनीतील अच्युतराव जोशी यांच्या घरात दरोडा घालण्यासाठी गेले आणि अच्युतराव जोशी, त्यांची पत्नी उषा जोशी आणि मुलगा आनंद जोशी या तिघांचेही दोरीने फास लावून खून केले. यात त्यांनी अन्नपूर्णेची चांदीची मूर्ती आणि गणपतीची मूर्ती चोरून नेली. या प्रकरणात पोलिसांना गुन्हेगार सापडले नाहीत. यानंतर पुण्यातच 1 डिसेंबर, 1976 रोजी गजानन अभ्यंकर यांच्या 'स्मृती' या बंगल्यात दरोडा घालण्यासाठी सायंकाळी प्रवेश केला. या बंगल्यात जकुल, सुतार, जगताप आणि मुनव्वर शहा हे दरोडेखोर गेले. या गुन्ह्यात त्यांनी प्रसिद्ध संस्कृत पंडित काशिनाथपंत अभ्यंकर, त्यांच्या पत्नी इंदिराबाई अभ्यंकर, त्यांची नात जाई, नातू धनंजय आणि मोलकरीण सखुबाई अशा पाचही जणांचा दोरीने फास लावून खून केला. या दरोड्यातून त्यांना 30—35 हजारांची मालमत्ता मिळाली. 23 मार्च, 1977 ला रात्री जकुल आणि सुतार यांनी त्यांच्याच मित्राचा  भाऊ अनिल गोखले याचा निर्घुण खून केला आणि प्रेत पोत्यात  भरून नदीत फेकून दिले. या गुन्ह्यांमध्ये मुनव्वर शहाचा प्रत्यक्ष—अप्रत्यक्ष सहभाग होता. याचाच परिणाम  म्हणून तो फाशीच्या तख्तापर्यंत पोहचला.

या सर्व गुन्हयात सहभागी गुन्हेगारांना पकडण्यात आले. खटला चालण्याच्या कालावधित त्यांना तुरुंगात ठेवण्यात आले. मुनव्वर शहाखेरीज कुठलाही गुन्हेगार पश्चातापदग्ध होऊन या  भयानक गुन्ह्याची सत्यकथा सांगायला तयार झाले नाहीत. एकटा मुनव्वर शहाच हे सांगू शकला कारण कुटुंबातील धार्मिक संस्कार, अपराधाबद्दलचा तीव्र पश्चाताप आणि कारागृहातील वास्तव्यातील धार्मिक पुस्तकांच्या वाचनाचा हा परिणाम मुनव्वरच्या जीवनावर झाला. सामाजिक जबाबदारीची जाणीव ठेऊन मरणाच्या दारात उभे असताना मुनव्वरने हे आत्म चरित्र लिहिले. त्याच्या आत्म चरित्रापासून समाजातील अपराधाच्या मार्गावरून प्रवास करणाऱ्यांना निश्चितच बोध मिळेल अशी आशा करायला हरकत नसावी.

वास्तविक हे शब्दांकित आत्म चरित्र आहे. त्यातही फाशीची शिक्षा सुनावल्यानंतर मृत्यूच्या विकराल स्वरूपाच दर्शन होत असताना, स्वतच्याच जीवनाकडे पाहण्याची तटस्थ वृत्ती, आत्मचरित्रातील सत्यकथन, 'स्व' ला मिळालेल केंद्रस्थान आणि लेखनामागील उदात्त हेतू यामुळे हे एक सुंदर आत्मचरित्र आहे. हे नोंदविणे गरजेचे आहे. तरीही शंका एवढीच की, शेवट हा एका अपराध्याचा कबुलीजबाब आहे. त्याच्या निरागस कबुलीजबाबाने त्याने केलेल्या गुन्ह्यात उद्ध्वस्त झालेल्या निरपराधांची आयुष्ये पुन्हा बसविता येत नाही. निरपराध माणसांच्या बेचिराख झालेल्या संसाराला पुन्हा मांडता येत नाही. म्हणूनच दुसऱ्यांच्या हत्यांचा गुन्हा कबुल केल्याने ही साताउत्तरांची कहाणीही सफल होत नाही हेही तेवढेच खरे आहे.

## संदर्भ टिपा :

1) मुनव्वर शाह, येस आय ॲम गिल्टी ! (संपा.) षुभदा गोगटे, पुर्नमुद्रण,फेब्रुवारी 2011, पृ.17